संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# मंत्रिमंडळाबरोबर भाजपाच्या विस्ताराचे समीकरण

केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार म्हणजे नरेंद्र मोदींच्या राजकीय खेळीचाही एक भाग पडतो. या विस्तारावरून ज्यांच्यावर गुन्हेगारी स्वरूपाचे आरोप आहेत अशा वीसजणांचा समावेश असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. अर्थात काँग्रेसला असा आरोप करण्याचा नैतिक अधिकारही पोहचत नाही; परंतु एकूणच स्वच्छता अभियान राबवण्याचे उद्दिष्ट ठेवणाऱ्या नरेंद्र मोदींनी निदान आपले केंद्रीय मंत्रिमंडळ स्वच्छ चारित्र्याच्या चेहऱ्याचे तरी ठेवायला हवे होते. हे त्यांना जमलेले नाही. याचा दुसरा अर्थ असा होतो की, त्यांना कितीही मोठमोठी राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य करायची असली तरी राजकीय तडजोडी करण्याशिवाय पर्याय नाही असे दिसते. खरे तर त्यांच्याकडे पूर्ण बहुमत आहे. आपल्याच पक्षातल्या अधिक चांगली आणि स्वच्छ प्रतिमा असलेल्या अनेकांना मंत्रीपदाची जबाबदारी देता आली असती. गोव्याचे मनोहर पर्रिकर यांचा एक अपवाद सोडला तर बाकीच्यांबाबत फारसे बोलायला जागा उरत नाही. सुरेश प्रभू हे एक नाव त्यातल्या त्यात बऱ्या स्वरूपाचे आहे. मात्र त्यांची कोणतीही तात्विक, राजकीय किंवा सामाजिक भूमिका नाही. ज्या सरकारमधून सत्तेची संधी प्राप्त करता येईल, तिकडे वळणाऱ्यांपैकी ते म्हणावे लागतील. काँग्रेसच्या राजवटीत त्यांना अशी संधी मिळणे शक्य नव्हते. दोन वेळा शिवसेनेचे खासदार म्हणून निवडून गेल्यानंतर त्यांनी शिवसेनेशीही फारशी निष्ठा ठेवलेली दिसत नाही. आता भाजपा सत्तेवर आल्यावर त्यांनी नितीन गडकरींच्या माध्यमातून दिल्लीतले बस्तान बसवण्याचा प्रयत्न केला. गडकरींनादेखील आपले ऐकणारा एखादा मंत्री दिल्लीमध्ये हवा होता. याशिवाय झारखंड, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, कर्नाटक, आंध्र या राज्यांमधूनही मंत्रीपदाचे वाटप झालेले आहे. साधारणपणे या सगळ्या राज्यांमध्ये आपला राजकीय प्रभाव वाढवण्याकरता अगदी योजनापूर्वक ही मंत्रीपदे दिलेली आहेत. मंत्री झाल्यानंतर त्या त्या व्यक्तीवर संबंधित राज्यात भाजपाचा प्रचार आणि प्रसार करण्याची जबाबदारी आपोआपच सोपवली गेली आहे. त्याला सुरेश प्रभूदेखील अपवाद ठरणार नाहीत. कोकणातून दोन वेळा खासदार झालेल्या प्रभूंना आपली थोडीफार राजकीय करामत दाखवावी लागेल. आतापासूनच त्यांना पुढच्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाचा प्रभाव असणारा मतदारसंघ निर्माण करावा लागेल. भारतीय जनता पार्टीच्या केंद्रीय मंत्रिमंडळाचा हा चेहरामोहरा दिसायला ठाकठिक वाटत असला तरी, जोपर्यंत प्रत्यक्ष ठोस कामांमधून काही व्यक्त होत नाही तोपर्यंत हे जंबो मंत्रिमंडळ काँग्रेससारखेच कारभार करणारे वाटू शकते. फक्त मोदींसारखा थोडी कामाची तडफ असलेला नेता त्याचे नेतृत्व करत असल्यामुळे लोकांमध्ये थोडीफार आशा निर्माण होऊ शकते. मंत्रिमंडळ विस्ताराबरोबर भाजपाने स्वत:च्या विस्ताराचेही गणित किंवा समीकरण त्याबरोबर जोडलेले आहे.असे म्हणायला हरकत नाही.

### पर्रिकरांपुढे सुरक्षित भारताचे आव्हान

महाराष्ट्र आणि गोवा यासंदर्भात जर विचार केला तर मनोहर पर्रिकरांसारख्या स्वच्छ प्रतिमेच्या नेत्याकडे संरक्षण खाते देऊन मोदींनी तेवढा चाणाक्षपणा दाखवला आहे. गेले पाच महिने देशाला स्वतंत्र संरक्षण मंत्रीच नव्हता. यावरून देशाच्या संरक्षण व्यवस्थेकडे आपण अजूनही गांभीर्याने पहात नाही. निदान काँग्रेसच्या राजवटीत जे काही पहिले पाच दहा मंत्री शपथ घेत असत त्यामध्ये दुसरा क्रमांक संरक्षण खात्याला असायचा. त्यासाठी स्वतंत्र कार्यभार असलेला मंत्री पंतप्रधानांबरोबरच शपथ घेत असे. त्यापाठोपाठ गृह, अर्थ या खात्यांचा नंबर लागत असे. मोदींच्या मंत्रिमंडळात मात्र अरुण जेटली यांच्याकडे पाच महिने अर्थ, संरक्षण अशी दोन्ही महत्त्वाची खाती दिली गेली होती. सरकार आल्यानंतर महिनाभर तर ते आजारीच होते. अशा परिस्थितीत देशाच्या सुरक्षिततेसारख्या संवेदनशील निर्णयांना किती न्याय दिला गेला असेल याबद्दल शंका निर्माण होते. अनेक निर्णय हे मंत्र्याच्या स्वाक्षरीशिवाय पूर्ण होत नाहीत आणि जर मंत्र्यांकडे दोन दोन, तीन तीन खाती असतील तर महत्त्वाच्या निर्णयांनासुध्दा विलंब लागतो. उशिरा का होईना; परंतु हे खाते पर्रिकरांसारख्यांकडे आले आहे, त्यांना प्रचंड कामाचा उरक दाखवावा लागेल. कारण या खात्यामध्ये आज इतके निर्णय तुंबून पडले आहेत की ज्याचा परिणाम थेट तीनही दलाच्या सैनिकांच्या मनोधैर्यावर होत आहे. तीनही दलांकडे आज सगळ्याच प्रकारच्या सामुग्रीची प्रचंड कमतरता आहे. आजच्या क्षणी जर कोणाशीही युध्द छेडले गेले तर केवळ तीस ते चाळीस दिवस पुरेल एवढाच शस्त्रसाठा तीनही दलांकडे आहे. याशिवाय लष्कराला हवी असलेली आधुनिक शस्त्रसामुग्री उपलब्ध झालेली नाही. नौदलाकडे अत्याधुनिक पाणबुड्या नाहीत. आहेत त्याच पाणबुड्यांची डागडुजी करून त्या वापरण्याची वेळ नौदलावर येत आहे. त्यामुळेच गेल्या वर्षभरात सहा पाणबुड्यांमध्ये अपघात घडले.आणि काही नौसैनिकांना आपले प्राण गमवावे लागले. हवाई दलाच्या बाबतीतसुध्दा अमेरिकेकडून खरेदी करावयाच्या विमानांबाबत अक्षम्य दिरंगाई झाली आहे. अजूनही काही विमानांचे अपघात होतात. काही दिवसांपूर्वी तर नौदलातल्या एका सैनिकाच्या पत्नीने आंदोलनाचा अभिनव मार्ग निवडला आणि आमच्या नवऱ्यांचे प्राण धोक्यात घालू नका. अशा प्रकारचे आवाहन सरकारला केले गेले. यावरून लष्कराच्या साधनसामुग्रीची कल्पना येते. बाकी चीनची सुरू असलेली सीमावर्ती भागातील रस्ते बांधकामाची घुसखोरी, श्रीलंकेजवळ उभा होत असलेला चीनचा लष्करी तळ, पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्या सीमावर्ती भागातून सतत सुरू असलेल्या कुरापती असे अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. या सर्वांशी सामना करण्याचे धोरण पर्रिकर यांना आखावे लागेल. आतापर्यंत संरक्षणाच्या अनेक मूलभूत गोष्टींकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. म्हणूनच स्वच्छ भारत अभियानाबरोबर सुरक्षित भारत हाही एक फार मोठा पल्ला मोदी सरकारला गाठायचा आहे.

### भाजपाच्या गाडीला प्रभूंचा डबा

या मंत्रिमंडळ विस्तारात सुरेश प्रभू यांच्याकडे रेल्वे खाते दिले गेले आहे. मुंबईत निवास केलेल्या सुरेश प्रभूंना मुंबईकरांच्या उपनगरीय लोकल सेवेच्या काय अडचणी असतात त्याची चांगली जाणीव आहे. वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात त्यांना देशभरातील नद्या जोडण्याचे काम दिले गेले होते. त्याचे नेमके पुढे काय झाले हे अजून तरी नीट कळलेले नाही. मात्र प्रभू यांनी आता रेल्वे जोडण्याचे काम अधिक कार्यक्षमपणे करून दाखवावे. स्वाभाविकपणे ते मुंबईतले असल्यामुळे उपनगरीय रेल्वे सेवा सुधारण्याच्या त्यांच्याकडून अपेक्षा आहेत. गेल्या महिनाभरापासून मुंबईच्या तीनही रेल्वे मार्गांवर जो काही सावळा गोंधळ सुरू होता. तो पाहिल्यावर रेल्वेला कोणी वाली उरलेला नाही, अशाच पध्दतीचा होता. ४५ लाख लोकं या उपनगरीय सेवेचा वापर करतात. सामान्य माणूस आपल्या नोकरी व्यवसायासाठी याच लोकल सेवेवर पूर्णपणे अवलंबून असतो. हीच लोकल सेवा जर रोज ढेपाळत असेल, कुठे ना कुठे काही ना काही बिघाड होत असेल तर रेल्वे कारभारामध्ये नियोजन राहिलेले नाही हे सिध्द होते. मुंबईतली रेल्वे प्रवाशांची गर्दी आणि गाड्यांची वाढत जाणारी संख्या याचा ताळमेळ साधायचा असेल तर आणखी पर्यायी रेल्वे मार्गांचा किंवा उन्नत रेल्वे कॉरिडॉरचा तातडीने विचार झाला पाहिजे. गेल्या दहा वर्षांपासून रखडलेले मेट्रोचे प्रकल्प पुढच्या पाच वर्षांत कार्यान्वित झाले पाहिजेत. तरच नरेंद्र मोदींचा हा एकूण मंत्रिमंडळ विस्तार आणि सुरेश प्रभू यांच्याकडे रेल्वे मंत्री पद देण्याचे काम सत्कारणी लागले असे म्हणता येईल.